IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# आधुनिक संस्कृत नाटककार प्रभाकर भातखंडेंच्या नाटकांतील स्त्री-चित्रण

**प्रा. रुपाली रघुनाथ वाडेकर**
संस्कृत विभाग, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*आधुनिक संस्कृत*
*नाटककार*
*स्त्री*

**ABSTRACT**

प्रभाकर भातखंडे हे आधुनिक संस्कृत नाटककारांपैकी एक प्रख्यात नाटककार आहेत. त्यांनी संस्कृतमध्ये जवळपास २५ लघुनाटिका या सदरात मोडणाऱ्या एकांकिका लिहिलेल्या आहेत. त्यांच्या प्रकाशित एकांकिका पैकी एक पुस्तक ललनाख्यानम् या शीर्षकाचे आहे. त्या पुस्तकात ललनाख्यानम्, शिल्पगूढा आणि इति मानवीयम् अशी तीन नाटके आहेत. या तीनही एकांकिका नायिकाप्रधान आहेत. त्यांच्या या एकांकिका आजच्या एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे प्रातिनिधित्व करतात. तसेच त्यांच्या नाट्यसप्तकम् या पुस्तकातील नृत्यकूटम् आणि ईशावास्यमिदम् या नाटकातील नायिका अनुक्रमे कलिका आणि गंधाली याही आधुनिक काळातील स्त्रिया आहेत.

एकविसाव्या शतकातील स्त्री ही जीवनाच्या विविध स्तरांवर निरनिराळ्या आह्वानांना पेलत पुरुषाबरोबर खंबीरपणे उभी राहणारी स्त्री आहे. अबला, परावलंबी, पीडित या तिच्या गतकालीन प्रतिमेतून बाहेर पडत स्वतःला सक्षम आणि सबळ सिद्ध करणारी वीरांगणा आहे. भातखंडेंच्या नाटकांतील स्त्री-प्रतिमा ही अशीच आधुनिक स्त्रीची आहे. त्यांच्या उपरोक्त पाच नाटकांचा आढावा जरी घेतला तरी ही गोष्ट स्पष्ट होईल.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 1%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Wadekar, R. R. (2025). *आधुनिक संस्कृत नाटककार प्रभाकर भातखंडेंच्या नाटकांतील स्त्री- चित्रण.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **846–848.**

प्रभाकर भातखंडे हे आधुनिक संस्कृत नाटककारांपैकी एक प्रख्यात नाटककार आहेत. त्यांनी संस्कृतमध्ये जवळपास २५ लघुनाटिका या सदरात मोडणाऱ्या एकांकिका लिहिलेल्या आहेत. त्यांच्या प्रकाशित एकांकिका पैकी एक पुस्तक ललनाख्यानम् या शीर्षकाचे आहे. त्या पुस्तकात ललनाख्यानम्, शिल्पगूढा आणि इति मानवीयम् अशी तीन नाटके आहेत. या तीनही एकांकिका नायिकाप्रधान आहेत. त्यांच्या या एकांकिका आजच्या एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे प्रातिनिधित्व करतात. तसेच त्यांच्या नाट्यसप्तकम् या पुस्तकातील नृत्यकूटम् आणि ईशावास्यमिदम् या नाटकातील नायिका अनुक्रमे कलिका आणि गंधाली याही आधुनिक काळातील स्त्रिया आहेत.

एकविसाव्या शतकातील स्त्री ही जीवनाच्या विविध स्तरांवर निरनिराळ्या आह्वानांना पेलत पुरुषाबरोबर खंबीरपणे उभी राहणारी स्त्री आहे. अबला, परावलंबी, पीडित या तिच्या गतकालीन प्रतिमेतून बाहेर पडत स्वतःला सक्षम आणि सबळ सिद्ध करणारी वीरांगणा आहे. भातखंडेंच्या नाटकांतील स्त्री-प्रतिमा ही अशीच आधुनिक स्त्रीची आहे. त्यांच्या उपरोक्त पाच नाटकांचा आढावा जरी घेतला तरी ही गोष्ट स्पष्ट होईल.

१) ललनाख्यानम् – या नाटकात मुख्य भूमिका वासंतीची आहे. वासंती ही एका सैनिकाची पत्नी आहे. तिचा नवरा युद्धात मारला गेला म्हणून शासनाकडून तिला सन्मानचिह्न आणि पारितोषिकाने, सोबत पाच लाख धनराशीने गौरवण्यात येते. या धनाचा विनिमय आपल्या नवऱ्याचे स्मारक उभारून करावे असा तिचा मनोदय असतो, परंतु तिच्या सावत्र सासूला आणि नणंदेला तिची संपत्तीत वाटणी नको असते. त्यामुळे ते तिचे पुनर्लग्न तिच्याच व्यसनी आणि कुचकामी दिराशी करण्याचा विचार करतात. वासंतीला हे अमान्य असता ते तिला घरातून निघून जायला सांगतात. तेव्हा सैन्यदलातून तेजस्विनी निरोप घेऊन येते की वासंतीचा नवरा विजयसिंह जिवंत आहे. तेव्हाच वासंतीला भोवळ येते व हे सगळ्यांना जाहीर होते की ती गर्भवती आहे. विजयसिंहाच्या अनुपस्थितीत ती त्याच्या आठवणींवर जगण्याचा निर्धार घेऊन स्वतःचे धैर्य बांधत असते. ती हारून जात नाही तर स्वतःच्या बाळासाठी आयुष्याशी संघर्ष करत जगण्याची उमेद बाळगून असते. ती निराधार असून तिच्या प्रेमाच्या बळावर ती एकटी राहण्याची हिम्मत करते आणि अंततः दैव तिला अनुकूल होते आणि तिला नवरा जिवंत असल्याची बातमी समजते.

२) शिल्पगूढा – ही स्त्रीप्रधान एकांकिका असली तरी ती वास्तववादी नाही. मूर्तिकार स्वामीने घडविलेल्या एका मूर्तीमध्ये कोणी एक शिल्पदेवता राहते. मूर्तीकारासमोर जेव्हा ती प्रकट होते तेव्हा मूर्तीकाराला आपली दिवंगत प्रेयसीच परत आल्यासारखी वाटते. तो तिच्या संभोगासाठी तिच्या इच्छेविरुद्ध तिला पकडू पाहतो तेव्हा ती संमोहन विद्येने त्याला नपुंसक आणि एक वर्ष कालावधीसाठी लुळा-पांगळा करून टाकते. मूर्तीकाराचा सूड घेण्यासाठी त्याच्या घरात वेष बदलून राहणाऱ्या सेवकाला शिल्पदेवता विषप्रयोगाने मारून टाकते. शिल्पदेवता तिच्यावर अतिप्रसंग करण्याची इच्छा बाळगणाऱ्या मूर्तीकाराला योग्य ते शासन करते ही शिल्पदेवता इंद्राच्या दरबारातील कुणी अप्सरा असून ती अत्यंत सुंदर आहे पण, स्त्रीचे सौंदर्य हे पुरुषाच्या सम्भोगासाठी नसून ते तिच्या व्यक्तिमत्वाला अधिक सुशोभित करणारे तिचे भूषण आहे. पुरुषाच्या अहंकाराला चोख उत्तर देणारी ही शिल्पदेवता आधुनिक स्त्रीवादाला साजेशी आहे.

३) इति मानवीयम् – या नाटकातील मंजिरी ही उच्चविद्याविभूषित तरुणी आहे. ती कवीमनाच्या प्रसादाच्या प्रेमात असते. प्रसादशी लग्न करण्यासाठी ती आपले पिता विद्यासागर यांच्या प्रयोगशाळेत त्यांची अनुमती मागायला

जाते. वैज्ञानिक विद्यासागर आपल्या विज्ञान नावाच्या अस्त्राने प्रसादला यंत्रमानव बनवितात. विद्यासागाराच्या या अहंकाराने चिडून मंजिरी त्यांनाच अर्धयंत्रमानव बनवते आणि प्राणानिवेशिनी अस्त्राच्या मदतीने प्रसादला आणि त्याच्या जोडीला आणखी दोन यंत्रमानवांना पुन्हा मनुष्यत्व प्रदान करते. ती आपले पिता विद्यासागर यांनाही नंतर प्रसादाच्या सांगण्यावरून पूर्ववत् मनुष्यरुपात आणते. अशाप्रकारे जशास तसे सडेतोड उत्तर देणारी मंजिरी ही आधुनिक स्त्री आहे. ती हुशार आहे. वैज्ञानिक आहे. कलेप्रती तिला आवड आहे. ती रसिक मनाची आहे म्हणूनच भावनिक आणि हळव्या मनाचा प्रसाद तिला आवडला.

४) नृत्यकूटम् – या नाटकातील नायिका कलिका आहे. कलिका ही नर्तकी आहे. आपल्या होणाऱ्या पतीला म्हणजे वीरव्रताला खुनाचा तपास करण्यासाठी ती मदत करते. ती कमलिनीच्या खुन्याला म्हणजे विश्वनाथला पकडून देते. इथे पुरुषाच्या बरोबरीने त्याच्याप्रमाणे शौर्य गाजविणारी कलिका ही आधुनिक काळातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते. ती नृत्य करीत विश्वेश्वराच्या मंदिरात विश्वनाथाला दिसते आणि विश्वनाथ तिला गळ घालतो. पण, ती त्याच्या वाईट मनसुब्यांना ओळखून असते आणि ती हे सर्व तिचा प्रियकर वीरव्रत याच्या सांगण्यावरून करीत असते. शिवाय वीरव्रत गाभाऱ्यात लपून बसलेलाच असतो. त्यामुळे विश्वनाथ पकडला जातो. यात कलिकाची भूमिका महत्वाची आहे.

५) ईशावास्यमिदम् – या नाटकातील नायिका गन्धाली ही उमेश या नायकाची पत्नी आहे. उमेश हा सामाजिक बांधिलकी न मानणारा, न जपणारा असा एक मनुष्य. त्याला गन्धाली वेळोवेळी त्याच्या सामाजिक कर्तव्यांची जाणीव करून देते. ती स्वतः एक सुजाण जागरूक नागरीक आहे. ती स्वतःच्या सामाजिक कर्तव्यांप्रती दक्ष आहे. ती आपल्या मुलाला देखील योग्य शिक्षण देते. शाळेच्या इमारतीचे छत कोसळले त्यात चार मुले जखमी झाली. त्यांच्या उपचारासाठी गन्धालीने स्वतः जवळचे पैसे दिले. प्रकाश जेव्हा चोरीच्या हेतूने येऊन उमेशला लुटून गेला तेव्हा गन्धालीचा हाच चांगुलपणा उपयोगी आला. प्रकाशने गांधलीला पाहून आणि तिने केलेले उपकार स्मरून लुटलेले धन परत केले. गन्धाली ही एक उत्तम पत्नी, सुजाण आई आणि जागरूक नागरीक आहे. समाजात वावरताना समाज आणि कुटुंब यांच्यातील समतोल कसा राखला पाहिजे हे नाटककाराने गांधली या पात्राच्या रूपाने दाखवून दिले आहे.

अशाप्रकारे भातखंडेंनी आपल्या उपरोक्त पाच नाटकांतून आजच्या काळातील स्त्रीचे चित्रण केलेले आढळून येते. जशा समकालीन इतर भाषांमधील साहित्यात आजची स्त्री ही स्वतःच्या अस्मितेविषयी भान असलेली आणि तरीही निवडलेल्या क्षेत्रात समर्पणाने, निष्ठेने कार्यतत्पर असणारी आहे, तसेच भातखंडेंच्या आधुनिक संस्कृत नाटकांतील स्त्रीचे चित्रण हे कालसुसंगत आहे.

संदर्भ ग्रन्थ

भातखंडे प्र. म., ललनाख्यानम्, महाराष्ट्र सेवासंघ मुलुंड मुंबई, द्वितीय आवृत्ती, २०१४.
भातखंडे प्र. म., नाट्यसप्तकम्, महाराष्ट्र सेवासंघ मुलुंड मुंबई, प्रथम आवृत्ती, २००८.